# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
# MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई ४००००१ ☎ २२६७ ०२१० /१४८/२४८,२२१०२२२२ फॅक्स : २२६७३९१५

Bank of India Bldg, 3rd floor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001 ☎ 2267 0210 /148 /248, 22102222 Fax : 22673915

**ई-मेल - sec_mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, www.mpsconline.gov.in**


## प्राचार्य (प्रपाठक श्रेणी), शासकीय कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय किंवा शासकीय संस्था किंवा भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ (महाविद्यालयीन शाखा)

**धारिका क्रमांक : १५(१)(१५३)/७९८४/सात जाहिरात क्रमांक : १५/ २०१०**

आयोगामार्फत प्राचार्य (प्रपाठक श्रेणी), शासकीय कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय किंवा शासकीय संस्था किंवा भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ (महाविद्यालयीन शाखा) या पदावरील भरतीसाठी **ऑनलाईन** पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदासाठी अर्हताप्राप्त असलेले उमेदवार अर्ज करू शकतात.

**टिप** - प्रस्तुत जाहिरात न्यायालयीन मूळ अर्ज क्र.४२६/२००८ व मूळ अर्ज क्र. ५३२/२००८ मधील अपिल क्रमांक ९६७३/२००९ व अपिल क्रमांक ९७०६/२००९ वरील मा. उच्च न्यायालयाच्या अंतिम आदेशाच्या अधिन राहून देण्यात आली आहे.

**२. उपलब्ध पदसंख्या :- अराखीव-१**

शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. अपंग-२००६/(१६०/भाग-२/०६)/आस्था-२, दि. १३ फेब्रुवारी, २००९ नुसार अंध/अल्पदृष्टी मधील फक्त अल्पदृष्टी (LV), कर्णबधीर मधील फक्त अंशतः कर्णबधीर (PD) आणि अस्थिव्यंग मधील दोन्ही पायाने अधू/ एका पायाने अधू/ एका हाताने अधू (BL/OL/OA) प्रवर्गाचे अपंगत्व असलेले उमेदवार प्रस्तुत पदासाठी अर्ज करण्यास पात्र आहेत. **तथापि, अपंग प्रवर्गासाठी पद आरक्षित नाही.**

**३. वेतनश्रेणी-** ₹ ३७,४०० - ६७,००० + ग्रेड पे ₹ १००००/- , एकूण वित्तलब्धी अंदाजित ₹ ७०,०००/-

**४. पात्रता** :- **४.१** भारतीय नागरिक. **४.२ वय:-** (१) **दिनांक ०१ मार्च, २०११** रोजी ४५ वर्षे , मागासवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथीलक्षम. (२) महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील कर्मचाऱ्यांना उच्च वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिलक्षम (३) शासन आदेशानुसार माजी सैनिक, अपंग व खेळाडू इत्यादीसाठी वयोमर्यादा शिथिलक्षम राहील.

**४.२ शैक्षणिक अर्हता** :- (१) किमान ५५% गुणांसह मास्टरची पदवी किंवा O,A, B, C, D, E आणि F या लेटर ग्रेडसह ७ पॉइंट स्केल मधील B श्रेणीतील समतुल्य अर्हता (२) पी.एच.डी. किंवा समतुल्य पब्लीश्ड वर्क. (३) अस्खलितपणे वाचता, लिहिता व बोलता येण्याजोगे मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान. आणि **अनुभव** : विद्यापीठ / महाविद्यालये आणि अन्य उच्च शिक्षण संस्थामधील शिकविण्याचा/ संशोधनाचा किमान एकूण दहा वर्षाचा अनुभव आवश्यक.

**टिप-**
- **(अ)** For Ph.D. equivalence, status is “at least 5 international publications or 10 national publications in referred journals is desirable “. In publications the candidates should be Ist or Communicating author.
- **(ब)** Experience during Ph.D. work shall not be counted as experience in research.
- **(क)** The research project should be externally funded research projects of National level Government / Semi Government organisation such as UGC, CSIR, DST, ICSSR and such other institutions.
- **(ड)** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर केल्यानंतर अर्जात Ph.d. ला समतुल्य म्हणून Published work संबंधी दावा केल्यास Published work च्या Reprints तसेच Research work चा दावा केल्यास प्रकल्प मंजूरीचे आदेश व संशोधन पूर्ण केल्याची कागदपत्रे अर्ज केलेल्या पदाचा संदर्भ देऊन अग्रेषण पत्राद्वारे (forwarding letter) आयोगाकडे स्वतंत्ररित्या पाठविणे आवश्यक राहील.

**५.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरीता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा उच्चतम शैक्षणिक अर्हता/अनुभव याच्या आधारे निकष निश्चित करुन अथवा **चाळणी परीक्षेद्वारे** मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि / अथवा अनुभव शिथील केला जाणार नाही. चाळणी परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येईल.

**६. कर्तव्ये व जबाबदाऱ्या -** प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या याबाबतचा तपशील आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**७.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत **"उमेदवारांना सर्वसाधारण सूचना "** मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**८. शुल्क : (१)** अमागास - ₹ **४१०/-** **(२)** मागासवर्गीय - ₹ **२१०/-** **(३)** सदर शुल्क ऑनलाईन अर्जाची नोंदणी केल्यावर प्राप्त होणाऱ्या विहित चलनाद्वारे भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये कार्यालयीन वेळेत रोखीने भरावे लागेल.

**९.** अर्ज करण्याची पद्धत :- (१) प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.(२)पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज www.mpsconline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक ३० नोव्हेंबर, २०१० ते दिनांक २८ डिसेंबर, २०१०** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.(३) ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्याचे प्रात्यक्षिक (Demo) सदर वेबसाईटवर पाहता येईल.(४) विहित पद्धतीने दोन्ही टप्प्यांतील अर्ज सादर करण्याची (ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे व परीक्षा शुल्क बँकेत जमा केल्यानंतर Transation ID नोंदविणे) संपूर्ण कार्यवाही आयोगाने विहित केलेल्या कालावधीतच पूर्ण करणे आवश्यक आहे.(५)ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना उमेदवाराजवळ स्वतःचा अद्ययावत (Latest) फोटो (रुंदी ३.५ से.मी x उंची ४.५ से.मी) व स्वतःचा ई मेलआयडी असणे आवश्यक आहे. तसेच स्वतःची स्वाक्षरी व फोटो आयोगाच्या सूचनेनुसार विहित पद्धतीने स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे.(६) मदत : अर्जाच्या ऑनलाईन स्वीकृतीच्या व्यवस्थेसाठी आयोगाने मे. वास्ट इंडिया प्रा. लि. या संस्थेची नियुक्ती केली असून, सदर संस्थेने ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्यासाठी उमेदवारांच्या सोयीकरिता महाराष्ट्रातील तालुका स्तरावर व विविध प्रमुख शहरांमध्ये ऑनलाईन अर्ज स्वीकृती केंद्र [Online Application Centre (OAC)] निश्चित केली आहेत. सदर केंद्रांची मदत उमेदवारांना घेता येईल. अशा केंद्रांची (OAC) ची यादी आयोगाच्या **www.mpsconline.gov.in** या संकेतस्थळावर संपूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांकासह उपलब्ध आहे. अधिकृत केंद्राचा पत्ता व मदत ९७५७४४४०२० या दूरध्वनी क्रमांकावरुन उपलब्ध करुन घेता येईल. या केंद्रांवर उपलब्ध करुन देण्यात येणा-या सुविधेकरीता उमेदवाराला प्रत्येक परीक्षा /

भरतीसाठी आयोगास अदा करावयाच्या शुल्काव्यतिरिक्त ₹ २४/- इतकी रक्कम सर्व्हिस चार्जेस म्हणून रोखीने संबंधित केंद्रचालकास अदा करावी लागेल. सदर मदत केंद्र संबंधित संस्थेने उमेदवारांच्या सोयीसाठी निश्चित केलेली असल्यामुळे आयोगाचा सदर केंद्रांशी काहीही संबंध नाही.

**१०.** विहित पद्धतीने दोन्ही टप्प्यातील ऑनलाईन अर्ज सादर करण्याची संपूर्ण कार्यवाही **दिनांक २८ डिसेंबर,२०१०** रोजी **२३.५९** वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेब लिंक बंद करण्यात येईल.

**११.** सविस्तर जाहिरात आयोगाच्या **www.mpsc.gov.in** व **www.mpsconline.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**१२.** आयोगाची प्रस्तुत पदाची सविस्तर जाहिरात तंत्रशिक्षण संचालनालयाच्या **www.dte.org.in** व उच्च शिक्षण संचालनालयाच्या **www.dirhe.org.in** या वेबसाईटवर उमेदवारांच्या केवळ माहितीसाठी उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

**मुंबई :**
**दिनांक : ३० नोव्हेंबर, २०१०.**

**नि. श. पटवर्धन**
**उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग**